# मुंबई विद्यापीठ

मशिमाक/१३ /२०२१—२०२२

परिपत्रक :—

विषय:—विद्यापीठातर्फे आदर्श प्राचार्य पुरस्कार सन २०२०—२०२१ शिफारस करणेबाबत

आपणांस विदित आहे की, महाविद्यालयीन स्तरावर आदर्श शिक्षकांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर महाविद्यालयातील २ शिक्षक (यापैकी १ शहरी व १ ग्रमीण महाविद्यालयातील शिक्षक ) अशा आदर्श शिक्षकांना शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्याचप्रमाणे सन २०२०—२०२१ महाविद्यालयीन स्तरावर आदर्श प्राचार्यांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलल्या निकषाच्या आधारावर महाविद्यालयातील २ प्राचार्य (यापैकी १ शहरी व १ ग्रमीण महाविद्यालयातील प्राचार्य) विद्यापीठातर्फे निवड होणा—या पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्यांना प्रत्येकी रू. ११,०००/— (रूपये अकरा हजार फक्त ) रोख व त्यासोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येत आहे की, महाविद्यालयातील विविध शाखाअंर्तगत कार्यरत असलेले प्रायार्च यांना ५ वर्षे सेवा झालेल्या चारित्र्यसंपन्न, विशेष प्राविण्यासह अर्हता व अनुभव असलेल्या प्राचार्यांनी सोबत जोडलेल्या विवरण पत्राच्या इंग्रजी प्रतीमध्ये भरून उपकुलसचिव महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, २०४, दुसरा मजला, विद्यापीठ मुख्य इमारत , फोर्ट, मुंबई— ४०० ०३२ यांचेकडे टपाल विभागामार्फत मंगळवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत प्रस्ताव प्रत्येकी चार प्रतीत पाठवून देण्याची व्यवस्था करावी. (संबधित प्राचार्यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/दूरध्वनी कमांक /महाविद्यालयाच्या दूरध्वनी क. व घरचा पूर्ण पत्ता, तसेच संबधित प्राचार्यांचे विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत (Teachers/Principal approval) सोबत जोडणे आवश्यक आहे. (दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ नंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच अपु—या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद असावी.)

तसेच महाविद्यालयीन प्राचार्य यांचा प्रस्ताव संस्थाचालक यांचे मार्फत शिफारशीसह पाठविणे कमप्राप्त आहे.

(श्री. सुधिर पुराणिक )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई— ४०० ३२
१६ नोव्हेंबर, २०२१

# मुंबई विद्यापीठ

## वर्ष २०२०–२०२१ या वर्षाकरिता आदर्श प्राचार्य पुरस्काराकरिता शिफारस/अर्ज

प्राचार्यांचे नाव : ____________________

महाविद्यालयाचे नाव : ____________________ प्रथम नियुक्ती दिनांक ____________

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य म्हणून सलग ५ वर्षे सेवा झालेली आहे काय? | |
| २. | शोधपत्रिकेत (ISSN) प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांची संख्या. (वैयक्तिक) | |
| ३. | प्रकाशित साहित्य/पुस्तके (ISBN) ची संख्या. (वैयक्तिक) | |
| ४. | राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या व उपस्थिती (वैयक्तिक) | |
| ५. | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकरणात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग | |
| ६. | महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले किंवा कसे? नसल्यास, त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले? | |
| ७. | महाविद्यालयाचे नॅक/एनबीए संस्थेकडून मूल्यांकन/पुनर्मुल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे? सद्यस्थितीचा दर्जा/स्कोअर काय आहे? | |

| | | |
|---|---|---|
| ८. | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परिक्षांचे निकाल/गुणवत्तेबाबत मागील पाच वर्षाचा आलेख | |
| ९. | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरू केले? | |
| १०. | महाविद्यालयातील किती अध्यापकांना/विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहित करण्यात आले? तद्वतच महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (मेजर) व लघु (मायनर) स्वरूपाचे किती प्रकल्प सादर करण्यात आले आहेत? तसेच मान्य झालेल्या प्रकल्पांची संख्या | |
| ११. | महाविद्यालयामध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत (भौतिक व शैक्षणिक)? तसेच महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छते संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते? | |
| १२. | महाविद्यालयामार्फत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले? | |
| १३. | महाविद्यालयास विविध उपक्रमाबद्दल मिळालेली पारितोषिके | |

| | | |
|---|---|---|
| १४. | महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी. किंवा इतर संस्थांकडून प्राप्त झालेले अनुदान) | |
| १५. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रमराबविण्यात आले? | |
| १६. | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती टक्केवारी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे एन.सी.सी./एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे, सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात? | |
| १७. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (इंटरनॅशनल पीअर जर्नल) मधून महाविद्यालयातील संशोधकांनी किती शोधनिबंध प्रकाशित केले? | |
| १८. | महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात? | |
| १९. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा--यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते? महिला तक्रार निवारण कक्ष | |
| २०. | महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे. सदर संकेतस्थळ | |

| | | |
|---|---|---|
| | अद्ययावत ठेवण्यात येते काय? | |
| २१. | महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे? | |
| २२. | महाविद्यालयाकडून चालविण्यात येणा—या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख आहेत. | |
| २३. | इतर | |

(महिती आवेदकाने स्वत: भरून संस्थेच्या सचिव/अध्यक्षांमार्फत सादर करावी.)

**संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय**

(टिप : प्राचार्य सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय)

## संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय

(टिप : प्राचार्य सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय)

स्थळ :
दिनांक :

अध्यक्ष/सचिवांची
स्वाक्षरी व शिक्का

संस्थेचे नाव :— ______________________

## कार्यालयीन उपयोगाकरिता
## अहवालातील निरिक्षण